**विकास योजना कराड.**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (२) अन्वये फेरबदल.
पेठ मंगळवार न.र.यो.क्र.१, अंतिम भूखंड क्र. २२५ या मिळकतीमध्ये रस्ता, खुली जागा (गार्डन) व पार्किंग या प्रस्तावित आरक्षणांबाबत

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**शासन निर्णय क्रमांक :-टिपीएस १८१३/१६५२/प्र.क्र.४२७/१३/नवि-१३.**
**दिनांक :- ०६/०१/२०१४.**

**शासन निर्णय** :-सोबतची शासकिय **अधिसूचना** महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्रामध्ये प्रसिध्द करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(सुनिल मरळे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत** :-
१) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव.
२) मा. राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव.
३) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

**प्रति** :-
१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
३) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
४) सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा, सातारा.
५) जिल्हाधिकारी, सातारा.
६) मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, कराड.
७) व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय,पुणे.
(त्यांना विनंती करण्यांत येते की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्राच्या भाग-१ पुणे विभाग, पुणे पुरवणी भाग १ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी ५ प्रती या विभागास, संचालक,नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे, सहाय्यक संचालक,नगर रचना, सातारा शाखा, सातारा, मुख्याधिकारी, कराड नगर परिषद, कराड यांना पाठवाव्यात.)
८) कक्ष अधिकारी (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
यांना विनंती की सदरची अधिसूचना या विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत यावी.
९) निवडनस्ती (नवि-१३).

# अधिसूचना

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- ०६/०१/२०१४.**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

क्रमांक :- **टिपीएस १८१३/१६५२/प्र.क्र.४२७/१३/नवि-१३** - ज्याअर्थी, क-हाड शहराची सुधारीत विकास योजना (यापुढे "उक्त विकास योजना" असे उल्लेखिलेली)शासनाच्या नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-,१९०९/१३७८/प्र.क्र.१७६६/०९/वियो.मंजूरी/नवि-१३, दिनांक ०४ एप्रिल,२०१२ अन्वये मंजूर असून दिनांक २१मे,२०१२ पासून ती अंमलात आली आहे. (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेसाठी कराड नगरपरिषद हे नियोजन प्राधिकरण आहे (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेतील प्रस्तावानुसार मौजे कराड, न.र.यो.क्र.१, अंतिम भूखंड क्र.२२५ ही जमिन (यापुढे "उक्त जमीन" असे उल्लेखिलेली)रहिवास विभागात समाविष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.६/५८ दि.०७ ऑगस्ट,२०१२ अन्वये उक्त विकास योजनेत फेरबदल करुन उक्त जमिनीवर रहिवास वापराऐवजी " रस्ता, खुली जागा (गार्डन) व पार्कींग" असे आरक्षण प्रस्तावित करण्याचे ठरवून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे.) चे कलम ३७ (१) अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन उक्त जमिनीवर " रस्ता, खुली जागा (गार्डन) व पार्कींग" अशी आरक्षणे प्रस्तावित करणेबाबतचा फेरबदल प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी सादर केला आहे (यापुढे "उक्त फेरबदल प्रस्ताव" असे संबोधले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर आणि संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर, उक्त फेरबदलाचा प्रस्ताव नामंजूर करावा असे शासनाचे मत झाले आहे;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७चे पोटकलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन शासन उक्त विकास योजनेतील उक्त फेरबदल प्रस्ताव नामंजूर करीत आहे.

सदरची अधिसूचना नागरिकांच्या अवलोकनार्थ मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, कराड यांचे कार्यालयात, कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी उपलब्ध करण्यात येत आहे.

सदर अधिसुचना शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

(सुनिल मरळ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
सत्यमेव जयते

F:\Notifications\Section 37(2).Docx

# NOTIFICATION

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department,**
**Mantralaya, Mumbai 400 032.**
**Dated : 06/01/2014**

| Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 |
|---|

**No.TPS-1813 /1652 / CR-427 /13/ UD-13-** Whereas, the Revised Development Plan of the Karad Municipal Council (hereinafter referred to as ' the said Development Plan') has been sanctioned by the Government vide Urban Development Department's Notification No.TPS-1909/1378/C.R.1766/09/DP. Sanction/UD-13, dated the 4th April, 2012 (hereinafter referred to as the "said Notification") and has come into force with effect from the 21st May, 2012;

And whereas, the Karad Municipal Council is the Planning Authority for the said Development Plan (hereinafter referred to as "the said Planning Authority")

And whereas, in the said Development Plan, land bearing Final Plot No.225 in Town Planning Scheme No.1 of Karad (hereinafter referred to as "the said land") is included in ' Residential Zone' ;

And whereas, the said Planning Authority vide its General Body Resolution No. 6/58 dated 07th August,2012 resolved to earmark and reserve the said land for ' Road, Open Space (Garden) and Parking', by carrying out a modification to the said Development Plan, and after following all the legal formalities stipulated under section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah.XXXVII of 1966)(hereinafter referred to as "the said Act"), has submitted such modification to the Government for its sanction (hereinafter referred to as "the said Modification");

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, the Government is of the opinion that the said modification needs to be rejected;

Now therefore, in exercise of powers conferred by sub-section (2) of Section 37 of the said Act, the Government of Maharashtra hereby refuses to accord sanction to the said Modification.

नगर विकास विभाग
सत्यमेव जयते
मंत्रालय, मुंबई - 32.

F:\Notifications\Section 37(2).Docx

This Notification shall be kept open for inspection by the general public during office hours in the office of the Chief Officer, Karad Municipal Council, Karad.

This notification shall also be published on the Government web-site www.maharashtra.gov.in.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(Sunil Marale)
Under Secretary to Government.